आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१३ फेब्रुवारी २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या संयुक्त अरब अमिराती दौऱ्यावर रवाना/ दौऱ्यामधे वर्ल्ड गव्हर्मे◌े◌ंट समिटला करणार संबोधित/ तसंच अबू धाबीतल्या मंदिराचं करणार उद्घाटन

- शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी चर्चा करायला सरकार सदैव तयार असल्याचं केंद्रीय कृषि मंत्र्यांचं प्रतिपादन

- कम्युनिटी रेडिओने केंद्रसरकारच्या कामाची माहिती श्रोत्यांपर्यंत पोहोचवावी असं माहिती आणि प्रसारण मंत्र्यांचं आवाहन

- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा भाजपात प्रवेश

- पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार गटाची सर्वोच्च न्यायालयात धाव

**आणि**

- बॅडमिंटन आशिया सांघिक विजेतेपद २०२४ स्पर्धेला मलेशियातल्या शाह आलम इथं प्रारंभ

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या संयुक्त अरब अमिरातींच्या दौऱ्यावर आज रवाना झाले. या भेटीत ते संयुक्त अरब आमिरातीचे अध्यक्ष शेख मोहंमद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार असून उभय नेत्यांची गेल्या आठ

महिन्यांमधली ही पाचवी भेट आहे. दुबईचे राजे शेख मोहम्मद बिन रशीद अल मखतूम यांच्या निमंत्रणावरुन ते उद्या दुबईत आयोजित वर्ल्ड गव्हरनमेंट समिट मधे भाग घेतील. या भेटीत दुबई बरोबरचे बहुपेडी संबंध अधिक बळकट होतील अशी आशा मोदी यांनी विमानतळावरुन प्रवासाला निघताना जारी केलेल्या निवेदनात व्यक्त केली आहे. या भेटीत प्रधानमंत्री अक्षर पुरुषोत्तम स्वामिनारायण संस्थेतर्फे अबूधाबी इथं उभारलेल्या त्या देशातल्या पहिल्या मंदिराचंही उद्घाटन करतील. मोदी उद्या दुपारी कतारलाही भेट देणार असून, त्या देशाचे आमिर शेख तामिम बिन हमद यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. अबूधाबी इथल्या भारतीय समुदायानं आयोजित केलेल्या अहलान मोदी कार्यक्रमात आपण सहभागी होणार असून देशोदेशी पसरलेल्या भारतीय समुदायाबद्दल अभिमान वाटतो असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी त्यांच्याशी चर्चा करायला सरकार सदैव तयार असल्याचं केंद्रीय कृषि मंत्री अर्जुन मुंडा यांनी म्हटलं आहे. दिल्लीच्या सीमेवर वेगवेगळ्या ठिकाणी आजपासून शेतकरी आंदोलन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर ते आज नवी दिल्ली इथ बतमीदारांशी बोलत होते. शेतकऱ्यांचं हित जपण्यासाठी सरकार बांधील आहे, आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल, असं ते यावेळी म्हणाले. शेतकऱ्यांचा प्रश्न हा राज्य सरकारांशी देखील जोडलेला असून, त्यावर चर्चेमधून तोडगा काढण्यासाठी एक मंच स्थापन करण्याची गरज असल्याचं ते म्हणाले. दरम्यान, शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, नवी दिल्ली इथं हवाई मार्गानं येणाऱ्या प्रवाशांनी योग्य नियोजन करावं अशी सूचना दिल्ली विमानतळ प्राधिकरणानं केली आहे.

<><><><><>

राष्ट्रीय लोकदल पक्षानं सत्तारुढ राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होण्याची घोषणा केली आहे. पक्षाचे अध्यक्ष जयंत चौधरी यांनी नवी दिल्लीत काल ही घोषणा केली. सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन आणि जनतेसाठी चांगलं काम करण्याच्या दृष्टीनं पक्षानं हा निर्णय घेतल्याचं चौधरी यांनी सांगितलं. पक्षाचे आमदार आणि कार्यकर्ते यांच्याशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेतल्याचं ते म्हणाले.

माजी प्रधानमंत्री चौधरी चरणसिंह यांना भारतरत्न सन्मान जाहीर करणं हा फक्त आपल्या कुटुंबाचा नव्हे, तर देशातले शेतकरी, युवक आणि गरिबांचा सन्मान असल्याचं त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

केंद्रसरकारचं ‘सबका साथ सबका विकास’ हे उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये भारतातल्या विविध भाषांमधल्या कम्युनिटी रेडियोची भूमिका महत्वाची असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी म्हटलं आहे. ते आज चेन्नई मध्ये आयोजित दक्षिण विभाग कम्युनिटी रेडिओ संमेलनाला संबोधित करताना बोलत होते. देशाच्या कानाकोपऱ्यातल्या नागरिकाचा आवाज सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे आदर्श व्यासपीठ असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

केंद्रसरकारनं २०१४ पासून कम्युनिटी रेडिओ स्टेशनला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी अतिरिक्त निधी दिल्याचं त्यांनी सांगितलं. एका परवान्यावर एक पेक्षा जास्त केंद्र उभारता यावीत, या दृष्टीनं याबाबतच्या धोरणात आवश्यक बदल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. कम्युनिटी रेडियो केंद्रांनी सरकारी माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून देशाला विकसित भारत बनवण्यामध्ये हातभार लावावा, असं आवाहन अनुराग ठाकूर यांनी केलं.

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज गुजरातमध्ये वलसाड जिल्ह्यात धरमपूर इथल्या श्रीमद राजचंद्र मिशनला भेट देणार आहेत. धरमपूरमध्ये त्या गुजरात मधल्या विशेषत: असुरक्षित आदिवासी गटांच्या सदस्यांशी संवाद साधणार आहेत.
राष्ट्रपती राजस्थानच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आज संध्याकाळी जयपूरला रवाना होतील. या भेटीदरम्यान त्या उद्या मेहंदीपूर बालाजी आणि बेनेश्वर धामला भेट देणार आहेत. राष्ट्रपती उद्या बेनेश्वर धाम इथं विविध स्वयं-सहायता गटांशी संबंधित आदिवासी महिलांच्या मेळाव्याला संबोधित करणार आहेत.

<><><><><><>

काँग्रेसचे राज्यातील ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी आज भाजपामध्ये प्रवेश केला. मुंबईत भाजपा मुख्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चव्हाण यांचं पक्षात स्वागत केलं. चव्हाण यांनी कालच काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. मिलिंद देवरा आणि बाबा सिद्दीकी या दोन प्रमुख नेत्यांनंतर अशोक चव्हाण काँग्रेस पक्षातून बाहेर पडल्यानं काँग्रेसला हा मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे. अशोक चव्हाण यांच्याबरोबर माजी आमदार अमर राजूरकर यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

मोठ्या संख्येने लोक प्रतिनिधी भाजपा मध्ये दाखल होतील. येत्या काही दिवसात हा आकडा स्पष्ट होईल अशी प्रतिक्रिया भाजप नेते गिरीश महाजन यांनी व्यक्त केली.

<><><><><><>

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालचा पक्षच राष्ट्रवादी काँग्रेस असून त्याला घड्याळ हे पक्षचिन्ह बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे.

दरम्यान अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हिएट दाखल केली असून याप्रकरणी आपलं म्हणणं ऐकून घेतल्याशिवाय काहीही निर्णय देऊ नये अशी विनंती केली आहे.

<><><><><><>

केंद्र सरकारच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंतपोचवण्यासाठी आयोजित विकसित भारत संकल्प यात्रेचा दुसरा टप्पा ठाणे शहरात सुरु आहे. ठाण्यातल्या दिपाली कालेकर यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

**होल्ड- बाईट- दिपाली कालेकर**

<><><><><><>

बॅडमिंटन आशिया सांघिक विजेतेपद २०२४ स्पर्धेला आज मलेशियातल्या शाह आलम इथं सुरुवात झाली. या द्वैवार्षिक स्पर्धेचा समारोप या महिन्याच्या १८ तारखेला होणार आहे. पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत भारताचा पहिला सामना उद्या हाँगकाँगसोबत होणार आहे. या स्पर्धेच्या विजेत्यांंना थाॅमस आणि उबेर कपसाठी आशियातले पात्र स्पर्धक म्हणून स्थान मिळणार आहे. या वर्षी २८ एप्रिल ते ५ मे दरम्यान चीनमध्ये चेंगडू इथं जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे.

<><><><><><>

शहरी वाहतुकीमध्ये क्रांती घडवण्याच्या उद्देशाने, दुबईने वर्ल्ड गव्हर्नमेंट समिट २०२४ मध्ये जगातली पहिली हवाई टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठीचा करार

केला आहे. या करारामुळे संपूर्ण दुबई शहरात इलेक्ट्रिक हवाई टॅक्सी आणि व्हर्टीपोर्ट नेटवर्क सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सेवेसाठी सुरुवातीला ‘जॉबी एव्हिएशन S4’ या नाविन्यपूर्ण विमानाला परवाना मिळाला असून, पायलट व्यतिरिक्त चार प्रवाशांना सामावून घेण्याची या विमानाची क्षमता आहे. कार्यक्षमता, सुरक्षितता आणि शाश्वतता, याबरोबर हवाई टॅक्सी सेवेमुळे ध्वनी प्रदूषणाच्या पातळीत घट, कमी कार्बन उत्सर्जन आणि प्रवाशांची सोय, असे फायदे मिळतील. दुबई मधली हवाई टॅक्सी सेवा २०२६ पासून कार्यरत होणार असून, हा उपक्रम भविष्यातल्या अधिक शाश्वत आणि सहज उपलब्ध परिवहन सेवेच्या दिशेने महत्वाचं पाऊल ठरेल असं अंदाज आहे.

<><><><><>

गुजराती समुदायाबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याबद्दल आरजेडी नेते तेजस्वी यादव यांच्यावर मानहानीचा खटला सुरू असून सर्वोच्च न्यायालयाने हा खटला निकाली काढला आहे. न्यायमूर्ती अभय ओक यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं हा निर्णय दिला आहे. गुजराती लोकांबाबत केलेलं विधान मागे घेत असल्याचं प्रतिज्ञापत्र त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दिलं होतं. न्यायालयानं ५ फेब्रुवारी रोजी निर्णय राखून ठेवला होता.

//<><><><><>//